**प्रेस नोट** **दि.०९/०३/२०१९**

**खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर**

**'३ वर्षाचे मुलीचे नातेवाईकांचा तीन तासात शोध'**

आज रोजी खडकी पोलीस ठाणे अंकित खडकी बाजार पोलीस चौकी कार्यक्षेत्रातील खडकी बाजार परिसरामध्ये एका ॲटोरिक्षामध्ये ३ वर्षाची एक लहान मुलगी झोपलेल्या अवस्थेत रिक्षा चालकास मिळुन आली. सदर रिक्षाचालकाने सदर मुलीकडे विचारपुस केली परंतु तीला तीचा नाव पत्ता सांगता येत नसल्याने त्याने सदर मुलीस खडकी बाजार पोलीस चौकीस हजर केले. त्यावर खडकी बाजार पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी सहा पोलीस निरीक्षक श्री ठाकुर यांनी त्यांचेकडील ताबे पोलीस कर्मचारी स.पोलीस फौजदार श्री तांबोळी, पो.शि. ९०९६ मेरगळ, पो.शि. ३८२७ गिरासे, पो.शि. ९९७३ गोपनर यांना सदर मुलीचा मोबाईलव्दारे फोटो काढुन घेवुन त्याव्दारे सदर मुलीचे नातेवाईकांचा खडकी पोलीस ठाणे हद्दीत विचारपुस करुन शोध घेणेबाबत आदेशीत केले. त्यानुसार सदर पोलीस कर्मचारी यांनी सदर मुलीचे नातेवाईकांबाबत तीचा फोटो नागरीकांना दाखवुन शोध घेणेचा प्रयत्न केला. अखेर तीन तासांचे नंतर सदर मुलीचे वडील श्री फिरोज मुमताजअली शेख रा. शेवाळे टॉवर खडकी बाजार, पुणे हे असलेबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. तदनंतर सदर मुलीचे वडीलांचे राहते पत्त्यावर जावुन त्यांना सदर मुलीचा फोटो दाखवीला असता त्यांनी सदर मुलगी त्यांचीच असल्याचे पाहुन ओळखुन खात्रीशिरपणे सांगितले व त्यांची मुलगी सकाळपासुन हरवली असुन ते देखील मुलीचा सर्वत्र शोध घेत असल्याचे समक्ष कळवीले. सदर मुलगी वय ३ वर्षे रा. सदर हिस तीचे वडीलांचे ताब्यात सुखरुप देणेत आले आहे.

सदर उत्तम कामगीरी ही सहा. पोलीस निरीक्षक श्री ठाकुर, सहा. पोलीस फौजदार श्री तांबोळी, पो.शि. ९०९६ मेरगळ, पो.शि. ३८२७ गिरासे, पो.शि. ९९७३ गोपनर यांनी केली असुन सदर ३ वर्षाचे मुलीचे नातेवाईकांचा तीन तासांचे आत शोध घेवुन तीला तीचे कुटुंबीयांचे ताब्यात सुखरुप दिले आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे